**ठळक बातम्या**

- भगवान महावीर जयंतीनिमित्त देशभरात विविध कार्यक्रम/ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विशेष टपाल तिकिट आणि नाण्याचं प्रकाशन

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या उमेदवार अर्जांची छाननी पूर्ण, माघार घेण्याचा उद्या शेवटचा दिवस

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातला प्रचार शिगेला

- कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या सदस्यसंख्येमधे यंदाच्या फेब्रुवारी महिन्यात १५ लाख ४८ हजाराची भर

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू आणि कोलकाता नाइटराइडर्स यांच्यातला सामना कोलकाता इथं, तर पंजाब किंग्स आणि गुजरात टायटन्स यांच्यातला सामना चंडीगढ इथं रंगणार

**<><><><><><>**

भगवान महावीर जयंतीनिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. महावीरांची शिकवण आणि लोकांच्या जीवनाच्या भल्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे अनुकरण करायला हवे असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे. भगवान महावीर यांनी शांतता, बंधुभाव आणि समाजाच्या उन्नतीचा मार्ग

दाखवला असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीर यांचा शांतता आणि सद्भावनेचा मार्ग महत्त्वाचा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या इंडिया मंडपम मध्ये २ हजार ५५० व्या भगवान महावीर निर्वाण महोत्सवाचं उद्घघाटन झालं. यावेळी त्यांच्या हस्ते भगवान महावीर यांचं पोस्टाचं तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन केलं. यावेळी बोलतांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत ही सर्वात प्राचीन संस्कृतीच नाही तर मानवतेचा सर्वात सुरक्षित स्वर्ग आहे. भारत केवळ स्वतःचाच नव्हे तर सगळ्यांप्रती कृतज्ञ आहे. भारत जगात सत्य, अहिंसा आणि आत्मविश्वास याचे प्रतिक आहे.

छत्तीसगडची राजधानी रायपुर इथं भगवान महावीर यांचा जन्म महोत्सव धार्मिक वातावरणात पार पडला. या निमित्तानं गेल्या पंधरा दिवसांपासून विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतीक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

भगवान महावीर जयंतीनिमित्त मुंबईतल्या ठिकठिकाणच्या जैन मंदिरांमध्ये आज विविध अध्यात्मिक कार्यक्रम सुरु आहेत.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या तिसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया काल पार पडली. या तिसऱ्या टप्प्यात दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या ९४ मतदारसंघांमध्ये पुढच्या महिन्याच्या सात तारखेला मतदान होणार आहे. या टप्प्यात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत उद्यापर्यंत आहे. महाराष्ट्रात रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर,

माढा, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि हातकणंगले या ११ मतदार संघांचा या टप्प्यात समावेश असून तिथे येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या टप्प्यात या महिन्याच्या २५ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून, तेरा मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

पहिल्या टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे पुढच्या टप्प्यांमध्ये प्रचाराला वेग आला आहे. सत्तारुढ आणि विरोधी आघाडीतले उमेदवार देशभरात प्रचारसभा घेत आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये केरळमधल्या बारा, कर्नाटकातल्या चौदा, राजस्थानातल्या तेरा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी आठ, मध्य प्रदेशातल्या सात, आसाम आणि बिहारमधल्या प्रत्येकी पाच, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधल्या प्रत्येकी तीन, तसंच जम्मू काश्मीर आणि त्रिपुरातल्या प्रत्येकी एका मतदारसंघात येत्या शुक्रवारी म्हणजे २६ तारखेला मतदान होणार आहे. प्रधानमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात नांदेड आणि परभणी तसंच कर्नाटकातल्या चिक्कबल्लारपूर आणि बेंगळुरू मतदारसंघांमध्ये सभा घेतल्या. मोदी यांनी नांदेडमधल्या सभेत बोलताना, निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबाबत समाधान व्यक्त केलं, तसंच मतदानाचं प्रमाण वाढवत नेण्याचं आवाहनही केलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आज नांदेड जिल्ह्यात देगलूर आणि मुखेड इथ जाहीर सभा होणार आहेत. भाजपाचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ या सभा होणार आहेत.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रचारगीतातून हिंदू धर्म आणि जय भवानी हे शब्द वगळण्याची सूचना केंद्रीय निवडणूक आयोगानं केली आहे. आपल्या पक्षाच्या मशाल या चिन्हासाठी तयार केलेल्या प्रचारगीतात हे दोन शब्द आहेत मात्र, प्रचारगीतातून हे शब्द वगळणार नाही, यासाठीचा न्यायालयीन लढा आम्ही लढू असं अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्री निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितलं. मध्यप्रदेश आणि कर्नाटक विधानसभांच्या निवडणूक प्रचारात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जय बजरंग बली म्हणत मतदान करण्याचं आवाहन केलं होतं. तर, सत्ता आल्यास सर्वांना मोफत अयोध्या दौरा घडविण्याचं विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं होतं. हे प्रकार धर्माच्या आधारावर मत मागण्याचा प्रचार नाही का, अशी विचारणा आपण निवडणूक आयोगाकडे केली होती. त्याबाबत स्मरणपत्रही पाठविलं होते. अद्याप निवडणूक आयोगाने यावर उत्तर दिलेलं नाही, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण रायगड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><><>**

ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या काल प्रसिद्ध झालेल्या तात्पुरत्या वेतनपट  आकडेवारीनुसार ईपीएफओमध्ये यंदाच्या फेब्रुवारी महिन्यात

१५ लाख ४८ हजार निव्वळसदस्यांची भर पडली. फेब्रुवारी महिन्यात ७ लाख ७८ हजार नव्या सदस्यांची भर पडली असल्याचं आकडेवारीवरून सूचित होत आहे. यापैकी बहुसंख्य जण युवा आणि प्रामुख्याने प्रथमच नोकरी मिळालेले आहेत. ७ लाख ७८ हजार नव्या सदस्यांपैकी सुमारे २ लाख ५ हजार महिला सदस्य आहेत. निर्मिती, विपणन सेवा, संगणक वापर, रस्ते वाहतूक, वाहने देखभाल, वस्त्रोद्योग इत्यादींशी संबंधित आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ दिसून आली आहे. एकूण निव्वळ सदस्यांपैकी ४१ पूर्णांक ५३ शतांश टक्के भर तज्ज्ञ सेवा क्षेत्रातील व्यक्तींची आहे.

सुमारे ११ लाख ७८ हजार सदस्य ईपीएफओमधून बाहेर पडले आणि त्यांनी पुन्हा एपीएफओचे सदस्यत्व घेतलं. याचा अर्थ या सदस्यांनी त्यांच्या नोकऱ्यांमध्ये बदल केले.

<><><><><><>

NTA अर्थात, राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं विद्यापीठ अनुदान आयोगाच्या NET अर्थात, राष्ट्रीय पात्रता चाचणी, २०२४ साठीची नोंदणी प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक उमेदवार अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या लिंकद्वारे राष्ट्रीय पात्रता परीक्षेसाठी अर्ज करू शकतात. १० मे पर्यंत नोंदणी प्रक्रिया सुरू राहणार आहे. ऑनलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क जमा करायची तारीख ११ आणि १२ मे रोजी आहे. केलेल्या अर्जात सुधारणा करायची असल्यास १३ मे ते १५ मे पर्यंत करता येणार आहे. UGC च्या अधिसूचनेनुसार, पात्र उमेदवारांना 'ज्युनियर रिसर्च फेलोशिप' प्रदान करण्यासाठी आणि 'सहाय्यक प्राध्यापक' म्हणून नियुक्ती आणि ८३ विषयांमध्ये पीएचडी प्रवेशासाठी परीक्षा या वर्षी १६ जून रोजी आयोजित केली

जाईल. उमेदवारांना फक्त एकच अर्ज भरण्याची परवानगी आहे. एकापेक्षा जास्त अर्ज भरणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे युजीसीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना कोलकाता इथल्या इडन गार्डन्स मैदानावर दुपारी साडे तीन वाजता रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू आणि कोलकाता नाइटराइडर्स यांच्यात होणार आहे. तर दुसरा सामना चंडीगढ इथं पंजाब किंग्ज आणि  गुजरात टायटन्स यांच्यात संध्याकाळी साडे सात वाजता होणार आहे. काल झालेल्या सामन्यात सनराईजर्स हैदराबादनं दिल्ली कॅपिटल्सला ६७ धावांनी हरवलं.

**//<><><><><>//**